सकाळ : पुणे Today 26/2/2011, p

# 'आयुका' सोमवारी विद्यार्थ्यांसाठी खुले

पुणे, ता. २५ : विज्ञानदिनानिमित्त येत्या सोमवारी (ता. २८) पुणे विद्यापीठातील खगोल भौतिकी केंद्र (आयुका) विद्यार्थ्यांसाठी खुले ठेवण्यात येणार असून, ज्येष्ठ शास्त्रज्ञांशी संवाद साधण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळणार आहे.

सायंकाळी सात ते रात्री दहा या काळात विद्यार्थ्यांना दुर्बिणीतून आकाशदर्शनाची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. या वेळी ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांच्याशी संवाद साधण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळणार आहे. यासाठी मर्यादित पास उपलब्ध आहेत.

विज्ञानदिनानिमित्त नारायणगावजवळील जायन्ट मीटरव्हेव्ह रेडिओ टेलिस्कोप (जीएमआरटी) येथे २८ फेब्रुवारी व एक मार्च रोजी विद्यार्थ्यांना भेट देता येणार आहे.